कोकणसाद
www.kokansad.com

शनिवार, दि. १५ ऑक्टोबर २०२२ ५



दोडामार्ग: कसई येथील ग्रामदेवता मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविताना महाविद्यालयाच्या एन. एस एस. विभागाची मुले.

# हळबे महाविद्यालयाच्या मुलांनी केली कसई ग्राममंदिर येथे स्वच्छता

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्गः** स्वच्छ भारत अभियानांतर्गत येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने नुकतेच कसई दोडामार्ग ग्रामदेवता श्री सातेरी देवी मंदिराच्या परिसराची स्वच्छता करण्यात केली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे व डॉ. राजेंद्र इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी मंदिरातील प्लास्टिक कचरा, परिसरातील प्लास्टिक आणि इतर कचरा जमा करून नगरपंचायतीच्या कचरा कुंडीमध्ये जमा केला. येथील विहीर, सांस्कृतिक कार्यक्रमाची स्टेज व सभा मंडप झाडून स्वच्छ केला. या उपक्रमात सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. राजेंद्र इंगळे यांनी आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.